# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४२५, सहकार**<br>**रूपये:- १३,८३,००,२७,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ५४४० | १० | अमरावती जिल्हयात 1596 नागरिकांचा कोरोना संसर्गामुळे मृत्यू झाला असून अनेक बालके अनाथ झाली आहेत व अनेक कुटूंबातील कर्ता पुरुष हरपल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होणे, कोरोना संसर्गामुळे मृत्यू झालेल्या बहूतांश शेतक-यांच्या शेतीसह, घरे, बँका व पतसंस्थेकडे गहाण असणे,याप्रकरणी शासनाने माहिती व निर्णय घेऊन सदरील कोरोनाने बळी गेलेल्यांचे कर्ज माफ करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (२) | ५५७७ | १० | ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वरिष्ठ सहाय्य अधिकारी आणि कनिष्ठ सहाय्य अधिकारी पदांच्या १७९ जागांवर नोकर भरती करताना अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले असणे, उक्त नोकरभरती रद्द करुन नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनास दिलेले असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (३) | ५५७९ | १० | राज्यातील शेतकऱ्यांना 3 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्का व्याजदराने मिळणारी योजना केंद्र सरकारने शेती कर्जासाठी अर्धा टक्का व्याजदर वाढवल्याने अडचणीत सापडलेली असणे, डॉ. पंजाबराव देशमुख पीक कर्ज सवलत योजनेत राज्य सरकार, केंद्र सरकार, जिल्हा सहकारी बँक यांनी संयुक्तपणे व्याजाचा बोजा आधीच उचलला असल्यामुळे वाढीव अर्धा टक्का व्याज शेतकऱ्यांना भरावे लागणार असणे, सदर वाढीव व्याजामुळे शेतकऱ्यांवर पडणाऱ्या रकमेचा बोजा व शून्य टक्के व्याजदराने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ५५८० | १० | कोकणातील आंबा बागायतदारांना बदलत्या हवामानाचा फटका बसत असल्याने बागायतदार आर्थिक संकटात सापडला असल्याने कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादन विक्रेते सहकारी संस्था मर्यादित यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन छेडण्यात आल्याचे माहे डिसेंबर,२०२२ मध्ये उघडकीस आलेले असणे, कोकणातील आंबा बागायतदारांना कर्जमुक्ती देऊन त्यांचा सातबारा कोरा करावा, त्यांना पुन्हा आंबा व्यवसायात उभे करण्यासाठी नवीन कर्ज उपलब्ध करून दयावीत, अशी मागणी आंदोलनात करण्यात आलेली असणे, सदर मागणीसंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (५) | ५५८३ | १० | राज्यातील पतसंस्थांतील ठेवींना संरक्षण देण्यासाठी शासनाने ०.०१० टक्के दराने अंशदान सक्तीची रक्कम जमा करण्यासंबंधी दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार १६००० पतसंस्थांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड या संघटनेच्या महासचिवांनी तीव्र विरोध करुन यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य व सहकार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले असणे, सदरहू निर्णयानुसार पतसंस्थांच्या एकूण १ लाख १० हजार कोटींच्या ठेवीसाठी तीन वर्षांचे रुपये २१६ कोटी अंशदान रक्कम जमा करण्याचे आदेश काढल्यामुळे पतसंस्थेच्या नफा क्षमतेवर परिणाम होऊन सदरहू संस्था आर्थिकदृष्ट्या कोलमडून जाण्याचा धोका निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले असणे, तसेच अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हास्थैर्य निधी सहकारी संघ या संस्थेच्या माध्यमातून लिक्वीडीटी बेस प्रोटेक्शन फंडांतर्गत ठेवींना संरक्षण देण्याच्या योजनेस आधीच शासनाची मान्यता असून मागील १० वर्षांपासून यशस्वीरित्या कार्यरत असल्याने हीच योजना कायम ठेवण्याची मागणी फेडरेशनने शासनाकडे केलेली असणे, उपरोक्त फेडरेशनच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (६) | ५५८४ | १० | राज्यात ३३,८९५ भूविकास बँकेमधील कर्जदार शेतकऱ्यांच्या थकीत रकमेची कर्जमाफी व कर्मचाऱ्यांची देणी देण्याबाबत दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन वित्तमंत्री तथा उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला असणे, याबाबत सहकार विभागाने समिती नेमून कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले असणे, यासंदर्भात भूविकास बँकेतील शेतकऱ्यांची कर्जमाफी व कर्मचाऱ्यांची देणी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (७) | ५५८६ | १० | राज्यात सहकार आयुक्तालया अंतर्गत कार्यरत विभागीय सहनिबंधक, अपर निबंधक, अपर आयुक्त या पदांच्या पदोन्नत्या रखडल्या असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या रखडलेल्या पदांच्या पदोन्नतीबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | ५५८८ | १० | देशांतर्गत कापूस बाजार तेजीत येण्यासोबतच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या धोरणाला बळ मिळावे याकरिता कापसाच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन देत अनुदान योजना जाहिर करावी, अशी मागणी शेती प्रश्नाचे ज्येष्ठ अभ्यासक यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.पंतप्रधान यांना लिहिलेल्या पत्रातून केल्याचे निदर्शनास आलेले असणे, उक्त मागणीसंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (९) | ५३५० | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली, मूल, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड यासह तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेऊन नियमित भरलेले असणे, अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन रक्कम देण्यात यावे असे शासनाचे स्पष्ट आदेश असतानांही चंद्रपूर जिल्हयातील नियमित कर्ज भरणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना त्या योजनेचा लाभ अघापही मिळालेला नसल्याची धक्कादायक माहिती माहे १५ फेब्रुवारी २०२३ च्या सुमारास निर्देशनास येणे, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेअंतर्गत असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या हजारो शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेऊन नियमित कर्ज जमा केले, अशा शेतकऱ्यांना सुध्दा ५० हजार रुपये प्रोत्साहन रक्कम मिळणे आवश्यक असतानाही अद्यापपर्यंत त्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मिळालेला नसणे, सदरील शेतकऱ्यांमध्ये वेळेवर कर्ज भरुनही महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५० हजार रुपयांचा लाभ मिळत नसल्याने जिल्हयातील शेतकऱ्यांत पसरत असलेला तिव्र असंतोष व सतापाचे वातावरण परिणामी याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५० हजार रूपये मिळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१०) | ५४१८ | १० | राज्य शासनाने राज्यातील शेतक-यांचे कर्ज माफ केले नसणे, शासनाने सन २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबविली असणे, या योजनेनुसार फक्त १.५० लाख पर्यत कर्ज माफ केले असणे, मात्र अनेक शेतक-यांना सदरच्या योजनेचा लाभ झाला नसणे, योजने अंतर्गत संगणकीय संस्करणामध्ये योजना निकषानुसार २.२७ लाख कर्जखाती योजना लाभास अपात्र ठरली असणे, ८८,८४१ कर्ज खाती शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१८ या योजने अंतर्गत लाभास कर्जमाफी पात्र ठरली असणे तथापि सदरची कर्ज माफी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना २०१९ अंतर्गत लाभास अपात्र ठरली असणे, सदर कर्जखात्यांना कर्ज माफी योजनेचा लाभ अद्याप प्रदान करण्यात आला नसणे, त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये व स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (११) | ५४२१ | १० | सांगली सहकारी बँक लि. शांतराम तलाव, कुरार व्हीलेज, मालाड, पशिचम , मुंबई येथे असून सदरची बँक बंद पडली असणे, ठेवीदारांच्या रक्कमा अद्याप दिल्या नसणे, ठेवीदारांनी फॉर्म भरुन दिला असणे, ठेवीदारांनी फॉर्म भरुनही ६ महिने झाले असणे, ठेवीदारांमध्ये नाराजी निर्माण झाली असणे, ठेवीदार नाराज निर्माण झाली असणे, ठेवीदार हवालदिल झाला असणे, महाव्यवस्थापक सांगली सहकारी बँक, दादर हे गांभिर्याने घेत नसणे, महाव्यवस्थापकांनी परस्पर कर्ज मंजूर केले असणे, अनधिकृत व नियमबाहय कर्ज दिले असणे, महाव्यवस्थापकांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता असणे, महाव्यवस्थापक ठेवीदारांची रक्कम देण्यास टाळाटाळ करीत असणे, परिणामी ठेवीदारांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष ठेवीदारांच्या रक्कम देण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४३५, इतर कृषिविषयक कार्यक्रम**<br>**रूपये:- ५६,२६,५३,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१२) | ५४५५ | १० | नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी म्हणून पन्नास हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल अशी घोषणा राज्य शासनाकडून केली असणे, सन 2013 पासून पीक कर्ज नियमित भरणा करणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांनाच प्रोत्साहन निधीचा लाभ देण्यात येईल असे शासनाकडून घोषणा होणे, दोन महिन्याचा कालावधी उलटून सुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पन्नास हजार रुपये रक्कम जमा न झाल्या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही |
| (१३) | ५४५७ | १० | महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमाफी योजने अंतर्गत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 50हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा राज्य शासनाने असणे, बुलढाणा जिल्ह्यातील 18 हजार 785 शेतकरी योजनेसाठी पात्र असून त्यापैकी केवळ 2 हजार 736 शेतकऱ्यांनाच प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळालेला असणे, 16 हजार पेक्षा जास्त शेतकरी वंचित असणे, अनुदानाच्या लाभांपासून वंचित असलेले शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाहीची कार्यवाही. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (१४) | ५७१८ | १० | राज्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजनेसाठी शेकडो शेतकरी पात्र असतानाही कर्जाची वेळेत परतफेड होऊ न शकल्याने हजारो शेतकऱ्यांना थकबाकीबाबत वसुलीच्या सक्तीच्या नोटीस सहकार निबंधक कार्यालयाकडून मिळाल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये देण्यात आलेले आहे. याबाबत निर्णय व्हावा. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१५) | ५७२१ | १० | शेतकरी पिक कर्ज :- केंद्र शासनाने बँकांना पीक कर्जापोटी देण्यात येणारा २% व्याज परतावा थांबविण्याचा निर्णय घेताना कुठेही शेतकऱ्यांचा विचार केलेला नाही त्यामुळे व्याज परतावा परत सुरू करून केंद्रांने सर्वसामान्य शेतकरी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांना दिलासा द्यावा. सदर व्याज परतावा बंद झाल्याने राज्यातील सुमारे ७० लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना फटका बसलेला आहे. त्यामुळे पिकांच्या उत्पन्नासाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्ठांच्या किंमती सातत्याने वाढ असून पिकांचा उत्पादन खर्च वाढत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडलेला आहे. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१६) | ५४३९ | १० | राज्यात कर्जमाफीसाठी पात्र ठरल्यानंतरही शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जाची रक्कम शासनाने जमा केलेली नसल्याने पात्र शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालेला नाही व बँका शेतकऱ्यांना वसुलीसाठी तगादा लावत असणे, अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुका मधील कु-हा, मुर्तीजापुर तरोडा, कौन्डन्यपूर, सालोरा, भिवापूर, मारडा, वरखेडी धामंत्री, वडंली, बोर्डा, चनुष्ठा अशा अनेक गावातील शेतकऱ्यांनी पीक कर्जमाफीसाठी शासनाकडे मागणी केली असणे, शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे लक्ष घालून राज्य शासनाने कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात भरण्याबाबत तातडीची करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१७) | ५४३४ | १० | शासनाने नियमीत कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे जाहीर केले असून तीन महिन्यांपूर्वी अमरावती जिल्ह्यातील पात्र ३२ हजार ४८६ शेतकऱ्यांपैकी १८ हजार ८१३ शेतकऱ्यांचा समावेश असलेल्या पहिली यादी जिल्हा प्रशासनास प्राप्त झाली असून दुसरी यादी रखडली असल्याने या यादीतील १३६७३ शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानांपासून वंचीत असणे , दुसऱ्या यादीतील १३६७३ शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्याची नितांत आवश्यकता असणे , परंतु अद्यापपर्यंत उर्वरीत शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५४४२ | १० | जुलै ते सप्टेंबर या कालावधीत अमरावती जिल्ह्यात अतिवृष्टीने कहर केल्याने जिल्ह्यातील शेती पिके नष्ट झाले असून राज्य शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टीची नुकसान भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्यात आली असून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अतिवृष्टीच्या अनुदानातून पिककर्ज किंवा कोणतेही कर्ज रक्कम कपात करू नये राज्य शासनाच्या अशा सूचना असताना टेंभूरखेडा ता. वरुड येथील विष्णु मंगर्दे या शेतकऱ्याचे युनियन बँक शाखा वरुड, आणि नांदगाव ख. येथील सेंट्रल बँक आणि स्टेट बँक या शाखेने शेतकऱ्यांच्या खात्यातून कृषिकर्जाची कपात केली असणे , जिल्ह्यातील बँक आणि बँकेचे अधिकारी मनमानी कारभार करीत असून त्यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी शेतकाऱ्यांकडून होत असणे , अतिवृष्टीच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अनुदानातून कपात केलेल्या कृषी कर्जाची रक्कम शेतकऱ्यांना परत देण्याची आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ५४५० | १० | कोणत्याही बँकेमार्फत कर्जदार शेतकऱ्यांचे बचत खाते गोठवण्यात येऊ नये असे शासनाचे आदेश तथा परिपत्रक असतांना युनियन बँक ऑफ इंडिया शाखा अंजनगाव सुर्जी आणि असदपूर ता. अचलपूर , सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दर्यापूर मार्फत कर्ज घेतलेल्या थकीत कर्जदार शेतकऱ्यांचे बचत खाते गोठवण्यात आलेले असणे संबंधित बँकेमार्फत कर्जदार शेतकऱ्यांचे बचत खाते गोठवल्याने शेतकरी नापिकीची अनुदान , पीक विमा योजनेचे अनुदान , गॅस सिलिंडर सबसिडी , प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या अनुदानांपासून वंचीत असणे , शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून शेतकऱ्यांना शासनाच्या विविध अनुदानांपासून वंचीत ठेवणाऱ्या बँकांवर कार्यवाही करून शेतकऱ्यांचे गोठवलेले खाते सुरू करून त्यांना शासनाचे अनुदान देण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२०) | ५४११ | १० | राज्यशासनाने राज्यातील शेतक-यांची कर्ज माफ केले नसणे, शासनाने सन २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेनुसार फक्त १.५० लाख पर्यत कर्ज माफ केले मात्र अनेक शेतक-यांना सदरच्या योजनेचा लाभ झाला नसणे, योजनेअंतर्गत संगणकीय संस्करामध्ये योजना निकषानुसार २.२७ लाख कर्ज खाती योजना लाभास अपात्र ठरली असणे, ८८,८४१ कर्ज खाती शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना २०१७ या योजने अंतर्गत लाभास पात्र ठरली असणे, तथापि सदरची सर्व खाती महात्मा ज्योतीराम फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना २०१९ अंतर्गत लाभास अपात्र ठरली असणे, सदरचे कर्ज खात्यांना कर्ज माफ झाले नसणे, सदरच्या योजनेचा लाभ अद्याप प्रदान करण्यात आला नसणे, त्यामुळे शेतक-यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग**<br>**रूपये:- ४,८२,६४,३७,०००/-**<br>**श्री. अनिल पाटील** |
| (२१) | ५३५६ | १०० | खानदेशातील तीनही जिल्ह्यात कापसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाणे, मात्र कापसावरील प्रक्रिया करणारे उद्योग इतरत्र असल्याने मेगा इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्कची तीव्र गरज असणे ,केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने देशभरात 10 ठिकाणी मेगा क्लस्टर योजनेअंतर्गत महाराष्ट्रात जळगाव येथे टेक्सटाईल पार्क उभारण्याची घोषणा करणे, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी याला 2016 मध्ये तत्वतः मान्यता देणे, मात्र सहा वर्ष झाली तरी सदरील वस्त्रोद्योग प्रकल्पाबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, सन 2022 मध्ये पुन्हा केंद्र सरकारने देशभरात दहा टेक्स्टाईल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पार्क उभारण्याची घोषणा करणे, त्यामुळे जळगाव जिल्ह्यातील नागरिकात निर्माण झालेली फसवणुकीची भावना, शासनाच्या घोषणांवरील कमी होत असलेला विश्वास, तसेच जळगाव जिल्ह्यात उभाराव्याच्या टेक्स्टाईल पार्क बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२२) | ५३३८ | १०० | येवला जि.नाशिक येथे रेशीम पार्क उभारणीसाठी रेशीम संचालक नागपूर यांनी दि. २६ ऑक्टोबर २०२१ अन्वये प्रादेशिक रेशीम कार्यालय पुणे यांच्याकडून प्रस्ताव मागविलेला असणे, ग्रामपंचायत एरंडगाव खु., ता.येवला, जि.नाशिक यांनी गट क्र. २९४ मध्ये २५ एकर जागा रेशीम पार्कसाठी देण्याबाबत दि. २६/१/२०२० रोजीच्या ग्रामसभेत मंजुरी घेवून ठरावाची प्रत यापूर्वीच पाठविलेली असणे, रेशीम संचालक नागपूर यांचे दि. २६/१०/२०२१ च्या निर्देशानुसार सदर जागा रेशीम संचालनालय / रेशीम विकास अधिकारी, जिल्हा रेशीम कार्यालय नाशिक यांचे नावे करून या प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रेशीम पार्क संबधी इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करून लवकरात लवकर रेशीम संचालक, नागपूर यांना सविस्तर प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२३) | ५४५३ | १० | ''संत गाडगेबाबा सहकारी सुतगीरणी मर्या. दर्यापूर जि. अमरावती या सुतगीरणीची नोंदणी दिनांक ०९/०४/१९८१ रोजी करण्यात आली असून सदर सुतगीरणी सुरळीत सुरू असताना सन २००७ मध्ये सुतगीरणीचा राज्य सहकारी बँकेच्या थकीत रकमेचा सुतगीरणीने भरणा न केल्याने केल्याने गिरणीची मशीनरी जप्त केलेली आहे , सदर सुतगीरणीकडे स्वमालकीची एकूण ६०.१३ हे आर जमीनी पैकी ३० एकर शेतजमीन असून उर्वरीत जमीनीवर सुतगीरणीची इमारत व मशीनरी असून सदर सुतगीरणी सुरू असताना अंदाजे ८०० कामगार कार्यरत होते , सदर सूतगीरणी बंद झाल्याने मोठ्यां प्रमाणावर कामगार बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे सदर सुतगीरणी पूर्ववत सुरू करण्याबाबत निरंतर मागणी होत असणे , सदर सुतगीरणी पूर्ववत सुरू करण्याबाबत मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली , मा सहकार मंत्री , मा वस्त्रोद्योग राज्यमंत्री , अपर मुख्य सचिव वित्त विभाग , प्रधान सचिव सहकार , व्यवस्थापयकीय संचालक , महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २१/१०/२०२० रोजी आढावा बैठक आयोजीत करण्यात आलेली होती , तद्नंतर मा मंत्री वस्त्रोद्योग यांच्या अध्यक्षतेखाली १०/०८ /२०२१ रोजी आढावा बैठक आयोजीत करण्यात आली असून सदर बैठकीत पूर्ववत सुरू करण्याकरीता तांत्रिक व आर्थिक निकषानुसार व्यवहार्यता तसेच या प्रकरणातील वैधानिक अडचणीबाबत संबंधीत क्षेत्रातील तज्ञांकडून तपासून घेऊन अहवाल सादर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करण्याचे आदेशीत केलेले होते , परंतु अद्यापपर्यंत सदर प्रकरणी कोणतेही कार्यवाही करण्यात आलेली नाही , यामुळे स्थानिक कामगारांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**रूपये:- १,७०,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (२४) | ५७१६ | १० | बुलढाणा जिल्हयात कापसाचे पीक हे प्रथम क्रमांकाचे पीक असुन दरवर्षी 3 लाख हेक्टरच्या वर कापसाचा पेरा होत असतो, त्यामुळे कापसाच्या पीकावरील प्रक्रीया उद्योगास चालना मिळाल्याने जिल्हयातील शेतक-यानां त्याचा फायदा होईल त्यामुळे कापुस ते कापड निर्मीती करीता टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत जाहीर केले होते परंतु परंतु कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (२५) | ५५६८ | १० | मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाच्या (एनटीसी) नऊ गिरण्यांच्या जमिनीवर असणा-या ११ चाळींचा पुनर्विकास करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, उक्त प्रश्नी तयार केलेल्या प्रस्तावाचे स्वरुप व त्यानुसार घेतलेला निर्णय, तसेच एनटीसीच्या नऊ गिरण्यांच्या जमिनींवरील ११ चाळींतील रहिवाशांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (२६) | ५५७२ | १० | महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण सन २०२३ - २०२८ साठी प्रस्तावित समिती दि. १६ नोव्हेंबर २०२२ रोजी गठीत केली असणे, राज्यात वस्त्रोद्योगामध्ये ५० टक्के वाटा भिवंडी (जि. ठाणे ) तालुक्याचा असताना सदर समितीवर भिवंडी तालुक्यातील लोकप्रतिनिधी व यंत्रमाग प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आलेली नसणे, माहे डिसेंबर, २०२२ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लोकप्रतिनिधी व यंत्रमाग प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्याची मागणी केलेली असणे, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (२७) | ५५७५ | १० | राज्यातील सूतगिरण्या आर्थिक संकटात सापडलेल्या असल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, शासनाने जाहीर केलेल्या एम.एस.पी.च्या भावात सूतगिरणीस कापूस उपलब्ध होत नसणे, राज्यातील सूतगिरण्यांना उभारी देण्यासाठी खेळते भांडवल व अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५६, नागरी पुरवठा**<br>**रूपये:- २,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (२८) | ५७२३ | १० | विविध कार्यकारी सेवा सोसायट्या आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी राज्य शासनामार्फत कर्ज वाटप रककमेच्या २.५% सक्षमीकरण निधी दिला जातो. सदर निधी सन २०१६-१७ सालापासून माझ्या कार्यक्षेत्रातील पुरंदर तालुक्याला मिळालेला नाही या बाबत निधी तरतूद करून निधी वितरित करावा. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४२५, सहकारावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,७५,५०,०५,०००/-**<br>**श्री. अनिल पाटील** |
| (२९) | ५३६६ | १० | राज्यातील काही व्यापारी, राष्ट्रीयकृत बँकांकडून शेतकऱ्यांना अल्पमुदतीचे पीक कर्ज देताना सिबिल अहवाल विचारात घेत असल्यामुळे शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणे, राज्यातील अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सिबिल स्कोर 600 ते 700 पर्यंत नसल्यामुळे बँकांनी पीक कर्ज नाकारल्याचे तक्रार माननीय विरोधी पक्ष नेते तसेच लोकप्रतिनिधी शासनाकडे केली असून याबाबत शासनाने करावायची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२३**

**श्री.राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई